**सं.फौ.ख.क्र. १७२/२०२४**

**सरकार –वि– ताईबाई वाघ**

**निशाणी क्र. ३०**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची शपथेवर जबानी.**

नांव – संतोष नाना गायकवाड

वय – ३५

धंदा – मजूरी

राहणार – कोकणटेंभी, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. मी कोकणटेंभीला पंचनाम्यासाठी गेलो होतो. मात्र त्याची तारीख मला सांगता येणार नाही. मला पंचनाम्यासाठी पो.उप.नि. आवारेंनी बोलावले होते. सदर पंचनाम्याबाबत मला आजरोजी आठवत नाही. दि.२५.१०.२०२३ रोजी मला आरोपीच्या घरी पंचनाम्यासाठी बोलावले होते किंवा कसे ते आठवत नाही. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूराविषयी मला काही माहित नाही. त्यावर माझी सही आहे. सहीला **निशाणी ३१** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**साक्षीदार सरकारी पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ती त्यांना देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.२५.१०.२०२३ रोजी उप पो.नि. आवारेंनी मला व दुसरा पंच संजय जाधवला पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी मला सांगितले की, आरोपी कोकणटेंभी येथे गावठी हातभट्टीची दारु अवैधरितीने विक्री करत आहे. त्याचा पंचनामा करायचा आहे. त्याला मी संमती दिली. आम्ही कोकणटेंभी येथील खंडेराव मंदिराजवळ गाडी लावून घटनास्थळी गेलो किंवा कसे हे मला आठवत

नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी एक महिला गावठी हातभट्टीची दारु विक्री करत होती ते मी पाहिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आम्ही छापा टाकल्यावर आरोपीसमोर असलेला इसम पळून गेला. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी त्या महिलेचे नाव विचारले असता तिने तिचे नाव ताईबाई उर्फ सुनिता सोमनाथ वाघ असे सांगितले. तिच्या ताब्यामध्ये ९ लिटर गावठी हातभट्टीची दारु मिळून आली किंवा कसे हे मला आठवत नाही. त्यापैकी एका बाटलीमध्ये सॅम्पल रासायनिक परिक्षणासाठी काढून घेतले व त्यावर आमच्या सह्यांची लेबले लावली व त्यानुसार पोलिसांनी सविस्तर पंचनामा केला किंवा कसे ते मला आठवत नाही.

३. मला लिहिता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्याच गावची असल्यामुळे तिला वाचवण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. पी. व्ही. काळे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

४. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलेलो नव्हतो त्यामुळे मला त्या महिलेचे नाव सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी लिहून ठेवलेल्या पंचनाम्यावर मी सही केली. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, पंचनामा त्याला पोलिसांनी वाचून दाखवला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयामध्ये बऱ्याच केसेसमध्ये पंच म्हणून येतो व माझे वडनेर भैरव पोलिसांशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यासाठी पोलिसांनी मला लेखी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.06 15:37:36 +0530

**दि. ०६.०३.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**

**सं.फौ.ख.क्र. १७२/२०२४**

**सरकार –वि– ताईबाई वाघ**

**निशाणी क्र. ३२**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची शपथेवर जबानी.**

नांव – नंदकुमार छबू गायकवाड

वय – ४२

पद – पोलीस शिपाई

नेमणूक – वडनेर भैरव पोलीस ठाणे, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.०४.०१.२०२४ रोजी मी वडनेर भैरव पो.स्टेशनला शिपाई म्हणून कार्यरत होतो. दि.०४.०१.२०२४ रोजी तपासी अंमलदारांनी मला सांगितले की, गु.र.क्र. २५४/२०२३ मधील सॅम्पल रासायनिक परिक्षणासाठी घेऊन जाण्यासाठी तुमची नेमणूक केली आहे. त्यानुसार मी फॉरेन्सीक लॅब नाशिकला मुद्देमाल जमा केला व तशी पावती घेतली. त्यासंदर्भात तपासी अंमलदारांनी मला पत्र दिले होते. ते पत्र मला आता दाखवण्यात आले. त्यावर तपासी अंमलदारांची सही आहे. त्याला **निशाणी ३३** देण्यात येते. मला फॉरेन्सीक लॅबमध्ये दिलेली पोहोच पावती दाखवण्यात आली. त्यावर संबंधितांची सही व शिक्का आहे. त्याला **निशाणी ३४** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. पी. व्ही. काळे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, तो मुद्देमाल कोणाकडून व कोणी जप्त केला याची मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो मुद्देमाल कोणत्या परिस्थितीमध्ये कोणत्या तापमानामध्ये ठेवला होता याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो मुद्देमाल मी टेम्परेंचर कंटेनरमध्ये नेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलतपास पूर्ण

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.06 15:37:44 +0530

दि. ०६.०३.२०२६

(वृषाली दी. सुंगारे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

क.स्तर चांदवड.

**सं.फौ.ख.क्र. १७२/२०२४**

**सरकार –वि– ताईबाई वाघ**

**निशाणी क्र. ३५**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ ची शपथेवर जबानी.**

नांव – त्र्यंबक तुकाराम पारधी

वय – ४५

पद – पोलीस हवालदार

नेमणूक – वडनेर भैरव पोलीस ठाणे, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.२५.१०.२०२३ रोजी मी वडनेर भैरव पो.स्टेशनला पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. माझ्याकडे गु.र.क्र. २५४/२०२३ चा तपास लेखी आदेशाने देण्यात आला होता. तो आदेश मला आता दाखवण्यात आला. त्यावर ठाणे अंमलदारांची सही आहे. त्याला **निशाणी ३६** देण्यात येते. मी स्वतः रेडकामी हजर असल्यामुळे मला घटनेची पूर्ण माहिती होती. मी आरोपीला सी.आर.पी.सी. ४१(१) प्रमाणे नोटीस दिली. ती नोटीस मला आता दाखवण्यात आली. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्याला **निशाणी ३७** देण्यात येते. मुद्देमाल कारकुनाकडे मुद्देमाल पावती फाडली. ती पावती मला आता दाखवण्यात आली. त्यावर सहा. पो. उप. नि. आवारेंची सही आहे. त्याला **निशाणी ३८** देण्यात येते. त्यानंतर मी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवले. ते साक्षीदार माझ्यासोबत छाप्याकामी हजर होते.

२. छाप्यावेळी पंच संतोष गायकवाड व संजय जाधव हजर होते. घटनास्थळ पंचनामा त्यांच्यासमक्ष केला. त्यावर त्यांनी वाचून सही केली.

मला आता तो घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर दोन्ही पंचांची व सहा. पो. उप. नि. आवारे यांची सही आहे. त्याला **निशाणी ३९** देण्यात येते. मी सदरचा मुद्देमाल रासायनिक परिक्षणासाठी पाठवला व तसे पत्र दोषारोप पत्रात दाखल केले आहे. ते पत्र मला आता दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ते निशाणी ३३ कडे आहे. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळून आल्यामुळे दोषारोप पत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात हजर असते तर मी तिला ओळखले असते. सी. ए. रिपोर्ट नंतर प्राप्त झाल्यावर मी तो न्यायालयात दाखल केलेला आहे. तो निशाणी १७ कडे आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. पी. व्ही. काळे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

३. मी पोलीस दलामध्ये १९ वर्षांपासून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोकणटेंभी परिसरामध्ये २०० ते २५० घरे आहेत. मी छाप्याकामी ज्या वाहनाने गेलो त्याचा नोंदणीकृत क्रमांक मला सांगता येणार नाही. छापा टाकायला जाण्यापूर्वी त्याची नोंद मी स्टेशन डायरीला घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, ज्या घटनास्थळावर छापा टाकला ते घर किंवा जागा कोणाच्या मालकीचे होते हे बघण्यासाठी मी कोणतीही शहानिशा केली नाही व तसे कोणतेही कागदपत्र सदर दोषारोप पत्रासोबत दाखल केले नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही पंच आमच्या पो.स्टेशनच्या इतर प्रकरणांमध्ये देखील पंच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, छापा टाकल्यानंतर ते तो मुद्देमाल रासायनिक परिक्षणासाठी देण्यापर्यंतच्या

जवळपास ४५ दिवसांच्या कालावधीमध्ये तो मुद्देमाल कोणत्या तापमानामध्ये जतन करुन ठेवला होता ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणामध्ये पंच सोडून इतर कोणीही स्वतंत्र त्रयस्थ साक्षीदार मिळालेला नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, बऱ्याचदा छाप्यावेळी आम्हाला बेवारस मुद्देमाल मिळून येतो. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा पो.स्टेशनला तयार करुन तेथेच पंचांच्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.06 15:37:54 +0530

**दि. ०६.०३.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**